**ग्रामपंचायत पोटनिवडणूक**
**नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागांबाबत - आरक्षण सोडतीचा कार्यक्रम**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेलद्वारे**

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०१/का-८,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०६/०४/२०२३

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी
(मुंबई शहर व मुंबई उपनगर वगळून)

**विषय :- ग्रामपंचायत पोटनिवडणूक**
**नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागांबाबत - आरक्षण सोडतीचा कार्यक्रम**

संदर्भ :- आयोगाचे समक्रमांकाचे दि. २०/०२/२०२३ चे पत्र व मतदार यादी कार्यक्रम आदेश

महोदय,

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण ,संचालन व नियंत्रण याची सर्व जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ii) आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक २०/०२/२०२३ च्या आदेशान्वये निधन, राजीनामा, अनर्हता किंवा इतर अन्य कारणांमुळे रिक्त झालेल्या पदांच्या पोटनिवडणूका घेण्यासाठी दिनांक ०९/०३/२०२३ रोजी सुमारे २६२० ग्रामपंचायतीतील सदस्यांच्या ३६६६ रिक्त जागांच्या पोटनिवडणूकांसाठी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

iii) मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दिनांक १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दिनांक ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

iv) **समर्पित आयोगाने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा निश्चित करण्यासाठी अहवालामध्ये टक्केवारीची शिफारस केलेली आहे.** समर्पित आयोगाच्या अहवालानुसार सदस्यांच्या जागा रिक्त असलेल्या ग्रामपंचायतीला नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या टक्केवारीची शिफारस करण्यात आली आहे किंवा कसे ?याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर करण्याबाबत आयोगाच्या दिनांक २०/०२/२०२३ च्या पत्रान्वये कळविले होते. राज्यातील २६२० ग्रामपंचायतीमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या ६१५ जागा रिक्त असल्याचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झाला आहे.

**समर्पित आयोगाच्या शिफारसी विचारात घेता, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागा अतिरिक्त ठरत असल्यास त्या अनारक्षित करुन सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित ठेवून सोडत काढणे आवश्यक आहे.**

v) **मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ च्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून,** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) मधील अधिकारांचा वापर करुन, **दिनांक ०९/०३/२०२३ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द झालेल्या ग्रामपंचायतींमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागा भरण्यापूर्वी, समर्पित आयोगाच्या अहवालातील शिफारशीनुसार अतिरिक्त ठरणाऱ्या जागा अनारक्षित करुन सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करण्यासाठी खालीलप्रमाणे आदेशित करण्यात येत आहे.**

## आदेश

१) **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या रिक्त जागा, समर्पित आयोगाच्या अहवालातील शिफारशीनुसार अतिरिक्त ठरत असल्यास प्रथमत: सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करण्यात याव्यात.**

२) वर नमूद केल्यानुसार मुलत: नागरिकांच्या मागसवर्ग प्रवर्गाकरीता आरक्षित असलेल्या ज्या जागा सर्वसाधारण प्रवर्गाच्या होतील, त्या जागांपैकी सर्वसाधारण महिलांकरीता आरक्षित ठेवावयाच्या जागा आरक्षण चक्रानुक्रमे फिरण्याच्या तत्वानुसार कोणत्या प्रभागात देय होतील हे निश्चित करण्यात यावे.

३) आवश्यकतेनुसार सदर जागांचे महिलांकरीता आरक्षण निश्चित करण्याकरिता सोडत प्रक्रिया राबविण्यात यावी. सोडत प्रक्रियेमध्ये सर्वसाधारण झालेल्या जागांपैकी कोणत्या जागा सर्वसाधारण महिलांकरीता होतील हे निश्चित करण्यात यावे.

४) सोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार आरक्षणसोडतीचा कार्यक्रम राबविण्यात यावा.

५) सोडतीनंतर त्यानुसार महिलांकरीता सुधारीत आरक्षण अधिसूचित करण्यात यावे व त्यास योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सोबत - परिशिष्ट - १**

( के. सुर्यकृष्णमूर्ती)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत:- १. प्रधान सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. विभागीय आयुक्त (सर्व) यांना उचित कार्यवाहीसाठी
३. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांना माहितीसाठी.
४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
५. जिल्हा पोलिस अधिक्षक ( सर्व संबंधित)
६. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग
७. राज्य निवडणूक आयोगातील निवडणूक कार्यासने.
८. निवड नस्ती.

# परिशिष्ट १

(क्रमांक-रानिआ/ग्रापंनि-२०२३/प्र.क्र.०१/का.०८,दिनांक -०६/०४/२०२३ च्या आदेशासोबतचे पत्र)

## ग्रामपंचायत पोटनिवडणूक
## नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या अतिरिक्त ठरणाऱ्या जागांसाठी आरक्षण सोडतीचा कार्यक्रम

| अ.क्र. | आरक्षणाचे टप्पे | कार्यवाही पूर्ण करण्याचा अंतिम दिनांक |
| --- | --- | --- |
| १ | ज्या ठिकाणी सोडत काढणे आवश्यक आहे तिथे सोडतीकरीता विशेष ग्रामसभेची सूचना देण्याचा दिनांक | दिनांक ११/०४/२०२३ (मंगळवार) |
| २ | विशेष ग्रामसभेमध्ये आवश्यकतेनुसार सर्वसाधारण जागा निश्चित करण्यासाठी सोडतीचा दिनांक | दिनांक १३/०४/२०२३ (गुरुवार) |
| ३ | नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची रिक्त जागा सर्वसाधारण जागा म्हणून अधिसूचित करण्यासाठी पूर्वी सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रसिध्द केलेल्या अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेमध्ये सुधारणा करुन त्याबाबत योग्य ती सूचना व प्रसिध्दी देण्याचा दिनांक | दिनांक १७/०४/२०२३ (सोमवार) |

मा. राज्य निवडणूक आयुक्त, यांच्या आदेशानुसार

(के. सुर्यकृष्णमूर्ती)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र